जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

प्रेसनोट क्र.२९१४ दि. ०६/०९/२०१९

# भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे शहर
## मिळुन आलेल्या ०३ वर्षीय मुलाच्या अंध व अपंग पालकांचा शोध घेऊन त्यास त्यांचे ताब्यात देवुन उल्लेखनिय कामगीरी केलेबाबत....

दि. ०६/०९/२०१९ रोजी एक लहान मुलगा भारती विद्यापीठ पोलीस ठाणे अंकित कात्रज चौकीसमोर एकटाच खेळत असल्याचे पाहुन चौकी अंमलदार पोहवा ५९२ शिंदे यांनी त्यांनी त्यांचे आई-वडीलांबाबत विचारले आसता, त्या लहान मुलास काहीएक सांगता आले नाही. यास्तव चौकी अंमलदार यांनी सदरचीबाब चौकी अधिकारी सपोनि चिवडशेट्टी यांना सांगितली असता, त्यानी सदरबाबत नियंत्रण कक्ष येथे कळवुन त्याबाबत ब्रॉडकास्ट करण्यात आले. तसेच दामिनी पथकातील महिला मपोशि १०९८५ काळे व मपोशि ४१८१ मोरे यांना कळविले असता, त्यांनी कात्रज भाजी मंडई, कात्रज चौक तसेच संतोषनगर या भागात मिळुन आलेल्या मुलाचा शोध घेतला असता, सदर मुलाचे पालक मुंजाजी दत्तराव गाढवे व आई महानंदा मुंजाजी गाढवे, रा. संतोषनगर कात्रज, पुणे हे मिळुन आल्याने त्याबाबत त्यांचा मुलाचे नांव विचारले असता, त्यांनी त्यांचे नांव योगेश मुंजाजी गाढवे, वय-०३ वर्षे असे सांगितले. सदरचा मुलगा घराबाहेर खेळत असताना, अचानक चालक कोठेतरी निघुन गेला होता असे सांगितले.

सदरच्या मुलगा नामे योगेश मुंजाजी गाढवे, वय-०३ वर्षे यांस त्यांचे अंध व अपंग पालकांच्या ताब्यात सुखरुप दिले त्याबाबत त्यांनी कृतज्ञता व्यक्त करून पोलीस दलाचे आभार मानले.

(वसंत वामन कुवर)
वरिष्ठ पोलीस निरिक्षक
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे शहर

